## MAHARASHTRA ACT No. XXXV OF 1970

### IDENTIFICATION OF PRISONERS (MAHARASHTRA PROVISION FOR UNIFORM APPLICATION AND AMENDMENT) ACT, 1970.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १२ नोव्हेंबर १९७० रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXV OF 1970

### AN ACT TO PROVIDE FOR UNIFORMITY IN THE PROVISIONS OF THE IDENTIFICATION OF PRISONERS ACT, 1920, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA, AND FURTHER TO AMEND THAT ACT IN ITS APPLICATION TO THE WHOLE STATE.

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २४ नोव्हेंबर १९७० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

## सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.

### कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२०, हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना त्याच्या उपबंधातील एकरूपतेसाठी तरतूद करण्याकरिता आणि तो अधिनियम संपूर्ण राज्यात प्रयुक्त असताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम

**ज्याअर्थी,** कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२०, हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना त्याच्या उपबंधामधील एकरूपतेसाठी तरतूद करणे आणि त्या प्रयोजनाकरिता राज्याच्या भागास तो प्रयुक्त असताना उक्त अधिनियमात ज्या विवक्षित अधिनियमितींनी सुधारणा करण्यात आली त्या अधिनियमिती राज्याच्या उर्वरित भागात लागू करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अधिनियम संपूर्ण राज्यास प्रयुक्त असताना यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, कैद्यांची ओळख पटविण्याबाबत (एकरूपतेने प्रयुक्त करण्याकरिता महाराष्ट्र उपबंध आणि सुधारणा) अधिनियम, १९७०, असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव आणि प्रारंभ.

(२) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील,** अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेपासून तो अमलात येईल.

सन १९२० चा अधिनियम तेहतीस याच्या कलम १ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रात आणि विदर्भ प्रदेशात अमलात असल्याप्रमाणेचा कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२०, याच्या कलम १ मधील पोट-कलम (२) मध्ये "भाग ब राज्यातील" या मजकुरापूर्वी, "महाराष्ट्र राज्याच्या हैद्राबाद क्षेत्राव्यतिरिक्त" हा मजकूर ४ सप्टेंबर १९५६ पासून जादा दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९२० चा अधिनियम तेहतीस सुधारणान्या विवक्षित अधिनियमितींची संपूर्ण राज्यात व्याप्ती.

३. कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२०, महाराष्ट्र राज्यात सर्वत्र एकरूपतेने प्रयुक्त करण्यासाठी तरतूद करण्याच्या प्रयोजनाकरिता बृहन्मुंबई किंवा राज्याचे मुंबई क्षेत्र यात प्रयुक्त असताना, कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२० यामध्ये, अनुसूचीत नमूद केलेल्या अधिनियमांच्या ज्या उपबंधांनी, सुधारणा केली आहे ते उपबंध, याद्वारे, राज्याच्या सर्व भागांना लागू करण्यात येत आहेत व अशा प्रकारे लागू केल्यामुळे ते राज्यात सर्वत्र अमलात राहतील.

सन १९२० चा अधिनियम तेहतीस, याच्या कलम ३ ची सुधारणा.

४. महाराष्ट्र राज्यात प्रयुक्त असताना, कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२० (यापुढे ज्याचा "मुख्य अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम ३ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

सिद्धदोषी व्यक्तींची मोजमापे वगैरे घेणें.

"३. (अ) एक वर्ष किंवा त्याहून अधिक मुदतीच्या सश्रम कारावासाच्या कोणत्याही शिक्षापात्र अपराधासंबंधी किंवा अपायकारक औषधी द्रव्यांबाबत अधिनियम, १९३०, याच्या कलम १९ अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधासंबंधी किंवा ज्या अपराधाच्या उत्तरवर्ती दोषसिद्धीबद्दल तिला वाढीव शिक्षा होण्याजोगी असेल अशा अपराधासंबंधी, सिद्धदोष असेल अशी प्रत्येक व्यक्ती, किंवा

(ब) फौजदारी व्यवहार संहिता, १८९८, च्या कलम ११८ अन्वये किंवा मुंबई मद्यनिषेध अधिनियम, १९४९ याच्या कलम ९३ अन्वये, चांगल्या वागणुकीबद्दल जिला जामीन देण्याचा आदेश दिला असेल किंवा अपायकारक औषधी द्रव्यांबाबत अधिनियम, १९३०, याच्या कलम १८ अन्वये विवक्षित अपराध करण्यापासून दूर राहण्यासाठी जामीन देण्याचा जिला आदेश देण्यात आला असेल अशी प्रत्येक व्यक्ती,

तिला तसे करण्यास फर्माविण्यात आले तर, पोलीस अधिकाऱ्यांना तिची मोजमापे व फोटो, विहित रीतीने घेण्याची मुभा देईल.".

सन १९२० चा अधिनियम तेहतीस याच्या कलम ४ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ४ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

सिद्धदोषी नसलेल्या व्यक्तींची मोजमापे वगैरे घेणे.

"४. (अ) (एक) अपायकारक औषधी द्रव्यांबाबत अधिनियम, १९३०, याच्या कलम १९ अन्वये किंवा मुंबई मद्यनिषेध अधिनियम, १९४९, याच्या कलम ६६, ६९ किंवा ८५ अन्वये किंवा मुंबई पोलीस अधिनियम, १९५१, याच्या कलम १२२ अन्वये किंवा औषधी द्रव्ये व जादूचे उपचार (आक्षेपार्ह जाहिरातींबाबत) अधिनियम, १९५४, याच्या कलम ७ अन्वये किंवा स्त्रिया व मुली यांच्या अनैतिक व्यापारास आळा घालण्याबाबत अधिनियम, १९५६, याच्या

कलम ८ अन्वये किंवा मुंबईचा भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९५९, याच्या कलम ६ किंवा ११ अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधासंबंधी किंवा एक वर्ष किंवा त्याहून जास्त मुदतीच्या सश्रम कारावासासह कोणत्याही इतर शिक्षापात्र अपराधाच्या संबंधात जिला अटक केली असेल अशी कोणतीही व्यक्ती, किंवा

(दोन) फौजदारी व्यवहार संहिता, १८९८, च्या कलम ५४, ५५ किंवा १५१ अन्वये किंवा पारपत्र (भारतात प्रवेश) अधिनियम, १९२०, याच्या कलम ४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाच्या संबंधी जिला अटक केली असेल अशी कोणतीही व्यक्ती, किंवा

(ब) पारपत्र (भारतात प्रवेश) अधिनियम, १९२०, याच्या कलम ५ अन्वये किंवा मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ याच्या कलम ५५, ५६ किंवा ५७ अन्वये जिच्या संबंधात निदेश किंवा आदेश देण्यात आला असेल अशी कोणतीही व्यक्ती, किंवा

(क) फौजदारी व्यवहार संहिता, १८९८, च्या कलम ३३७ किंवा ३३८ अन्वये जिला माफी देण्यात आली असेल किंवा फौजदारी व्यवहार संहिता, १८९८, च्या कलम ३३९ अन्वये जी दोषमुक्त ठरली असेल अशी व्यक्ती,

जर पोलीस अधिकाऱ्याने तिला तसे करण्यास फर्माविले तर पोलीस अधिकाऱ्यास, विहित रीतीने, तिची मोजमापे किंवा छायाचित्र घेण्याची मुभा देईल.".

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ४-अ मध्ये "मुंबई अभ्यस्त अपराधी निर्बंध अधिनियम, १९४७" या मजकुराऐवजी, "मुंबई अभ्यस्त अपराधी अधिनियम, १९५९" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९२० चा अधिनियम तेहतीस याच्या कलम ४-अ ची सुधारणा.

७. महाराष्ट्र राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रात प्रयुक्त असलेला कैद्यांची ओळख पटविण्याबाबत (हैद्राबादला प्रयुक्त करणे) अधिनियम, १९५६ हा रद्द होईल.

सन १९५६ चा हैद्राबाद अधिनियम सत्तावीस रद्द होणे.

अनुसूची इ

(कलम ३ पहा)

| अनुक्रमांक | अधिनियमांची नावे | लागू केलेले उपबंध |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | कैद्यांची ओळख पटविण्याबाबत (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९२२ (१९२२ चा मुंबई अधिनियम अकरा). | कलमे १ (२), २ व ३ (अ) खेरीज संपूर्ण अधिनियम. |
| २ | कैद्यांची ओळख पटविण्याबाबत (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९५३ (१९५३ चा मुंबई अधिनियम अठ्ठावन) | कलम २ खेरीज संपूर्ण अधिनियम. |
| ३ | मुंबई न्यायिक व कार्यकारी कामांचे विलगीकरण (पूरक) अधिनियम, १९५४ (सन १९५४ चा मुंबई अधिनियम आठ). | भाग दोनमधील अनुसूचीतील, कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२०, संबंधित नोंद. |
| ४ | मुंबई निरसन आणि सुधारणा अधिनियम, १९५४ (सन १९५४ चा मुंबई अधिनियम एकवीस). | दुसऱ्या अनुसूचीमधील, कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२०, या संबंधित नोंदीमधील त्या अधिनियमाच्या कलम ७ संबंधीची सुधारणा. |
| ५ | मुंबई राज्य पोलीस आयुक्तांबाबत अधिनियम, १९५९ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम छपन्न). | अनुसूचीमधील, कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२०, या संबंधित नोंद. |

(यथार्थ अनुवाद)
वा. ना. पंडित,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.